**देशी / एन आर ई/ एफ सी एन आर (बी) मुदत ठेवींच्या**
**तारणावरील कर्जांचे व्याजदर**

**भारतीय रिझर्व बँक**
**केंद्रीय कार्यालय**
**बँक व्यवहार आणि विकास विभाग**
**केंद्र - १, वर्ल्ड ट्रेड सेंटर**
**कफ फरेड, कुलाबा**
**मुंबई - ४०० ००५**

डीबीओडी/ डीआय आर. बीसी.१५३/१३.०३.००/९९-२०००

मार्च २३,२०००

सर्व शेड्युल कमर्शियल बँका (आर आर बी सोडुन)

प्रिय महोदय,

**देशी / एन आर ई / एफ सी एन आर (बी)**
**मुदत ठेवींच्या तारणावरील कर्जांचे व्याजदर संदर्भ**

आमचे निर्देशपत्र - डीबीओडी. क्र. डीआयआर. बीसी. १०७/१३.०१.०४/९९व १०८/१३.०१.०९/९९ दि. २९ ऑक्टोबर १९९९ च्या निर्देशांप्रमाणे बँकांनी देशी / एन आर ई/ एफ सी एन आर (बी) ठेवीदारांना त्यांच्या ठेवींच्या तारणावर कर्ज देतांना पीएलआर चा संदर्भ घेण्याचे बंधन नाही. परंतु असे लक्षात आले आहे की काही प्रकरणांमध्ये, विशेषतः २ लाखांच्या त्रयस्थ ठेवीदाराच्या तारणावर दिलेल्या कर्जाचे व्याज, हे ठेवीदारांच्या स्वतःच्या ठेवीच्या तारणावरील कर्जाच्या व्याजापेक्षा कमी दराचे आहे. तरी पुनर्विलोकनांनंतर असे ठरवले आहे की, बँकांना त्रयस्थ ठेवीदारांच्या तारणावरील रु २ लाखपर्यंतच्या कर्जांवर योग्य व्याज आकारण्याची मुभा बँकांना देण्यात यावी, जशी ठेवीदारांच्या स्वतःच्या ठेवीच्या तारणावरील कर्जांच्या व्याजदराबद्दल आहे. त्यामुळे आता बँकांना, अशा रु. २ लाख पर्यंतच्या कर्जांवर, पी एल आर संदर्भाशिवाय व्याजदर ठरविता येतील. परंतु, त्रयस्थ ठेवीदारांच्या तारणावर दिलेल्या रु. २ लाखपर्यंतच्या कर्जांवरील व्याजदर, भारतीय रिझर्व बँकेच्या वेळोवेळी दिलेल्या निर्देशांप्रमाणे ठरवले जातील.

(२) याप्रमाणे बदल करणारे निर्देश निर्देशपत्र. डीबीओ. क्र. डीआयआर. बीसी.१५१ व १५२/१३.०३.००/ ९९-२००० दि. मार्च २३,२०००सोबत जोडले आहेत.

(३) सूचना पुस्तिका, व्हॉल्युम १ - भाग - १ मध्ये खालील अनुषंगिक बदल करावेत :

(i) परिच्छेद ९, vi .१(ii) (बी) सोबतच्या स्लिप क्र. १० प्रमाणे बदलावा.

(ii) परिच्छेद ९, vi .२(ii) (बी) (बी) सोबतच्या स्लिप क्र. ११ प्रमाणे बदलावा.

(iii) परिच्छेद ९, vi .२(iii) (बी) (बी) सोबतच्या स्लिप क्र. १२ प्रमाणे बदलावा.

४. कृपया पोच द्यावी

आपला विश्वासू,

पी व्ही सुब्बाराव
मुख्य महाव्यवस्थापक

सहपत्र : वरीलप्रमाणे

**डीबीओडी. क्र. डीआयआर. बीसी. १५१ / १३.०३.००/ ९९-२०००**

मार्च २३, २०००

<u>ठेवींवरील व्याज दर</u>

बँकव्यवहार विनियम अधिनियम १९४९ च्या कलम २१ - ३५ए मधील अधिकारान्वये व निर्देशपत्र क्र. डी आय आर क्र. बीसी/१५१/ सी. ३४७ - ८५ दि. डिसेंबर २७, १९८५ (वेळोवेळी केलेल्या बदलांसह ) यात अंशतः बदल करण्यासाठी, भारतीय रिझर्व बँक सामान्य जनतेच्या हितासाठी बदल करणे आवश्यक व जरुरीचे असल्याची खात्री बाळगून, निर्देश देते की परिच्छेद ११ चे पोटकलम (ब) लगेच खालील प्रमाणे बदलण्यात यावे.

“(ब) जेव्हां एखाद्या अशा मुदत ठेवीवर कर्ज दिले जाईल, जी वरील पोटकलम (अ) च्या (i) ते (iv) च्या स्वरुपाची नसेल तेव्हां,

(i) बँका पीएलआर चा संदर्भ न घेता व्याजदर ठरवू शकतील - कर्जाची रक्कम रु २ लाखापर्यंत असल्यास

(ii) जर कर्जाची रक्कम रु २ लाखाच्या वर असेल तर आकारण्याचा व्याजदर भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या व्याज दर विषयक आदेशांना अनुसरुन असेल”,

निर्देशपत्र क्र. डीआयआर. बीसी. १५१/ सी. ३४७/ ८५. दि.डिसेंबर २७, १९८५ (वेळोवेळी केलेल्या बदलांसह) मधील इतर तरतुदी अबाधित राहतील.

(जी पी मुनीअप्पन )
कार्यकारी संचालक,

डीबीओडी क्र. - डी आय आर. बीसी. १५२/१३.०३.००/२०००

मार्च २३,२०००

विदेशी मुद्रा (अनिवासी) खाती (बँका) योजना

बँकव्यवहार विनियमन अधिनियम, १९४९ च्या कलम २१ व ३५ ए अन्व्ये, भारतीय रिझर्व्ह बँकेला, खालील बदल जनहितासाठी आवश्यक असल्याचे पटल्यावरुन ती निर्देश देते की, बँकेच्या निर्देशपत्र डीबीओडी. क्र. बीसी. ११५/ १३.०१.०९/९३ दि. एप्रिल २९, १९९३ (वेळोवेळच्या बदलांसह) मध्ये कलम (viii), उपकलम (बी) ऐवजी खालील मजकूर ताबडतोब ठेवला जावा.

“(ब) जेव्हां एखाद्या अशा मुदत ठेवीवर कर्ज दिले जाईल, जी वरील पोटकलम (ए) च्या (i) ते (iv) च्या स्वरुपायी नसेल, तेव्हां

(i) बँका पीएलआर संदर्भ न घेता, व्याजदर ठरवू शकतील :- कर्जाची रक्कम रु २ लाख पर्यंत असल्यास, आणि

(ii) जर कर्जाची रक्कम रु २ लाखपेक्षा जास्त असल्यास, आकारायचा व्याजदर भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या व्याजदर विषयक आदेशांना अनुसरून असेल निर्देशपत्र क्र. डीबीओडी क्र. बीसी. ११५/ १३.०१.०९ दि. एप्रिल २९, १९९३ (वेळोवेळच्या बदलांसह) मधील इतर तरतुदी अबाधित राहतील.

(जी. पी. मुनिअप्पन )
कार्यकारी संचालक

स्लिप क्र. १०
(प्रकरण ९, निर्देश पुस्तिका)
डीबीओडी, दीबीएस, आयईसीडी डी आय आर. बीसी. २००० चा १५१ ९. .....

(ब) जेव्हां अशा एखाद्या मुदतठेवीवर कर्ज दिले जाईल, जी वरील पोटकलम (ए) च्या (i)ते (iv) च्या स्वरुपाची नसेल, तेव्हा

(i) बँका पीएलआर चा संदर्भ न घेता व्याजदर ठरवू शकतील - कर्जाची रक्कम रु २ लाखपर्यंत असल्यास, आणि

(ii) जर कर्ज रु २ लाखपेक्षा जास्त असले तर आकारायचा व्याजदर भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या व्याज दर विषयक आदेशांना अनुसरुन असेल”

स्लिप क्र. ११
९. vi . २ (ii) (बी)
प्रकरण, निदेश पुस्तिका
डीबीओडी. डीबीएस. आय ई सीदी
डी आय आर. बीडी. २००० चा १५१

(बी) जेव्हां अशा एखाद्या मुदत ठेवीवर कर्ज दिले जाईल, की, जी वरील पोटकलम (ए) च्या (i) ते (iv) च्या स्वरुपाची नसेल, तेव्हां

(i) बँका पीएलआर चा संदर्भ न घेता व्याजदर ठरवू शकतील कर्ज रु २ लाख पर्यंत असल्यास, आणि

(ii) जर कर्ज रु २ लाख पेक्षा जास्त अस्ले तर, आकारायचा व्याजदर भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या व्याजदर विषयक आदेशांना अनुसरुन असेल.

स्लिप क्र. १२
प्रकरण ९, निदेश पुस्तिका डीबीओडी. डीबीएस. आय ई सी डी
डी आय आर. बीसी. २००० चा १५२

९. vi . २ (ii) (बी)

( बी) जेव्हां अशा एखाद्या मुदत ठेवीवर कर्ज दिले जाईल, जी वरील पोटकलम (ए) च्या (i) ते (iv) च्या स्वरुपाची नसेल, तेव्हां

(.i) बँका पीएलआर चा संदर्भ न घेता व्याजदर ठरवू शकतील - कर्ज रक्कम रु २ लाख पर्यंत असल्यास, आणि

(ii) जर कर्ज रु २ लाख पेक्षा जास्त असले तर आकारायचा व्याजदर भारतीय रिझर्व बँकेने वेळोवेळी दिलेल्या व्याज दर विषयक आदेशांना अनुसरून असेल.